# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायै समर्पिता

## दिनांक ०५.१०.२०१९ रोजी (का.प.क्र.३६) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक ०५ ऑक्टोबर २०१९ रोजी (का.प.क्र ३६) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वा.वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला सहाय्यक आयुक्त, श्री.डी.पी.कुलकर्णी, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| २. | स.स. श्रीमती स्वाती कीशोर नागरे |
| ३. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| ४. | स.स. श्री.रावसाहेब राधाकीसन आमले |
| ५. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| ६. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| ७. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| ८. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| ९. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| १०. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ११. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| १२. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| १३. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| १४. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| १५. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| १६. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| १७. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| १८. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| १९. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| २०. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| २१. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| २२. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |

मा.महापौर :आजच्या सभेला आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणुन अतिरिक्त आयूक्त श्री.डी.पी.कुलकर्णी आहे. उपस्थित सर्व अधिकारी व पत्रकार बांधवांचे मी मन:पुर्वक स्वागत करतो. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीची आचारसंहिता सुध्दा सुरु आहे. त्यामुळे आरोग्य, घनकचरा, दिवाबत्ती, पाणीपुरवठा या विषयांवर आणि आरोग्य संबंधित डेंग्यु या आजारांवर चर्चा करण्यात येईल. परंतु आता सभागृहात गणपूर्ती अभावी १० मिनिटासाठी ही सभा तहकूब करण्यात येते.

(वेळ ११.३२ वा. पुन्हा ११.४२ वा. सुरु झाली). १० मिनिटांच्या तहकुबीनंतर पुन्हा या सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यात येते. श्रीमती मुथा मॅडम जे अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची नोंद घ्यावी. जे अधिकारी येतील त्यांना आता बाहेर थांबविण्यात यावे. आचारसंहिता जरी असली तरी अधिकाऱ्यांची सभेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. जे अधिकारी आले नाहीत त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्याच्यांकडून खुलासा घ्यावा आणि त्याचा समाधानकारक खुलासा नसेल तर माझे पत्र लावून शासनाला तसे कळविण्यात यावे. शहरामध्ये कचऱ्याचा प्रश्न अंत्यत ज्वलनशील असताना अधिकाऱ्यांना या सभेचे महत्व कळते की नाही? श्री.डी.पी.कुलकर्णी यांना आदेश देण्यात येत आहेत की, या सभागृहाच्या माध्यमातून जे अधिकारी अनुपस्थित आहेत खास करुन ज्या अधिकाऱ्यांवर घनकचरा व्यवस्थापनाची जबाबदारी आहे ते व इतरही अधिकारी गैरहजर आहेत या सर्व अधिकाऱ्यांची श्रीमती मुथा मॅडम मला माझ्या दालनामध्ये ४ वाजेपर्यंत माहितीचा अहवाल द्यावा. कीती अधिकारी गैरहजर आहेत? फक्त एक शहर अभियंता यांची रजा असल्याची परवानगी आहे. अकाऊंट्सचेही श्री.पाटणी मुंबईला गेले तर त्यांना महापौर यांना कळविण्याची आवश्यकता नाही का? स्मार्ट सिटीचे अधिकारी नाही. जरी ते बोर्ड असले तरी ते महानगरपालिकेशी संबंधीत आहेत. स्मार्ट सिटीचा सुध्दा एक प्रतिनिधी सभेला हजर असणे आवश्यक आहे. एल.ई.डी. लाईटचे अधिकारी हजर नाही. यानंतर अधिकाऱ्यांमध्ये असा बेशिस्तपणा आढळल्यास आम्ही खपवून घेणार नाही. अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस द्या व खुलासा आल्यानंतर पत्र पाठवा. श्री.काझीही उपस्थित नाहीत. आता पून्हा गणपुर्ती नसल्याने पुन्हा ५ मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येते.

(वेळ ११.४४ वा. पून्हा सभा ११.४९ सुरु झाली)

मा.महापौर :५ मिनिटाच्या तहकुबीनंतर पुन्हा या सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यात येते. श्री.करण चव्हाण, श्रीमती घाडगे मॅडम,श्री.पंकज पाटील, श्री.के.डी.देशमुख, श्री.दराडे, विधी अधिकारी,लेखाधिकारी, उद्यान अधिक्षक उपस्थित नाहीत. हे जनतेचे इनस्टिट्युट आहे. आदर्श आचारसंहितेचे पालन आम्ही सुद्धा करतो. आरोग्य अधिकारी उपस्थित आहे पण घनकचऱ्यासंबंधी, पाणीपुरवठा व लाईट हे सर्व महत्त्वाचे विषय आहेत. निवडणूकांमध्ये असणारे बुथ, महानगरपालिकेच्या शाळा यांची व्यवस्था पाहण्याची व निवडणूका सूरळीतपणे पार पाडण्याचा महत्त्वाचा रोल मनपाचा आहे. या दृष्टीने आपण कामे करण्यासाठी तत्पर राहायला पाहिजे. महत्त्वाचा फक्त एक विषय जो डेंग्युशी संबंधीत आहे. शहरामध्ये जवळपास या डेंग्युच्या आजाराने ६-७ मुत्यु झालेले आहेत. आरोग्य विभाग व शासनाचा मलेरिया विभाग त्याचप्रमाणे मेडिकल कॉलेजच्या डीनच्या माध्यमातून व त्यांच्या सहकार्यातून तसेच डेप्युटी डायरेक्टर ऑफ हेल्थ, सिव्हिल सर्जन काही एन.जी.ओ.यांच्या माध्यमातून आपण समाधानकारक काम डेंग्यु या आजारावर नियंत्रण करण्याकरिता केलेले आहे. असे असताना निश्चितपणे मागच्या २-३ दिवसांची परिस्थिती कंट्रोलमध्ये आहे. त्या अनुषंगाने सर्व व्यवस्थित असले तरी या आजाराची व्याप्ती वाढू नये, हा आजार पसरु नये त्यासाठी वेळोवेळी ज्या सूचना दिलेल्या आहेत. अबेटिंग विषय असेल पाण्याच्या साठवणूक होण्याचा विषय असेल, फवारणी असेल बाकी सर्व जे काही प्रयत्न आहेत आणि विशेष करुन आपल्या आरोग्य केंद्रातील ओ.पी.डी. आहेत. त्या सुट्टीच्या दिवशी सुध्दा सुरु ठेवण्याचे आदेश दिले होते. त्याची अंमलबजावणी सुद्धा झाली आहे. वर्तमानपत्रातूनही जनजागृती

(Awarness) करिता निवेदन दिले होते. त्यासाठी माहिती सिस्टीम जी आहे त्यांनी रिक्षावर स्टिकर्ससुद्धा लावले आहेत. त्याही पलिकडे जाऊन आयुक्त साहेबांनी ९ झोनमध्ये, ९ क्वाडीनेटर्स ऑफिसर्स् नियुक्त केले. उद्या रविवार आहे. कर्णपुरा यात्रेत गर्दी राहिल. त्यामुळे काळजी घेण्याच्या दृष्टीने उद्या सुट्टी असली तरी त्या ठिकाणी आपले एक स्थिरपथक ठेवा. कॅम्प किंवा स्टॉलचे नियोजन करा. खाजगी रुग्णालयात १० टक्के खाट रिर्झव्ह केलेले आहेत. हाय रिस्क एरिया मध्ये आरोग्य तपासणी कॅम्प घेण्याचा अनुषंगाने आपण नियोजन केले पाहिजे. शाळांमध्ये असेल तसेच दर शनिवारी आपण कोरडा दिवस जाहीर केला आहे. संपूर्ण शहरामध्ये एक दिवस हा कोरडा दिवस असणार आहे. प्रसार माध्यमातून सुद्धा अतिशय चांगले प्रयत्न आपण केलेले आहेत. शाळा, स्कुल बस यामध्ये आरोग्याचा दृष्टीने स्टीकर्स लावले आहेत. एस.टी.महामंडळ, रेल्वे, छावणी परिषद यांना सुद्धा पत्र देऊन उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. आय.एम.ए.डॉक्टर्सचा सहभाग आपल्याला वाढवावा लागेल. त्यांना एक पत्र देण्यात यावे. मायक्रोबायोलॉजीच्या विभाग प्रमुखांनी जो अहवाल दिला, त्यासाठी पुन्हा डेंग्युच्या डासांच्या तपासणीचा जो निकष होता त्या निकाषाप्रमाणे ५० घरांपैकी जे १० घरे तपासायचे होते. त्याची मोहीम चालू राहु द्यावी. नागरिकांना असे वाटत की, पाणी पुरवठा अधिकारी यांनी पाण्याचे नियोजन हे फक्त डेंग्यु या आजारावर नियंत्रण करण्यापुरते केले आहे. नागरिकांचा असा समज आहे की, निवडणुक असल्यामुळे मुद्दाम पाणी पुरवठ्यांचा गॅप वाढवला. त्यामुळे त्यांना खुलासा असा द्या की, डेंग्यु या आजाराचे मुख्य कारण पाणी साठवण हे आहे. त्याकरिता केलेले हे प्रयत्न आहेत. डेंग्यु सदृश्य परिस्थिती लक्षात घेता, त्या अनुषंगाने महानगरपालिका पाणी पुरवठ्याचे केलेले हे नियोजन आहे. त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला हा गैरसमज आपण दुर केला पाहिजे.

श्री.नितीन साळवी:आमच्या वार्डात ४ दिवसाआड पाणी पुरवठा होत असुन आता पाचव्या दिवशी केले, लोक पाणी साठवून ठेवतात. नागरिकांचा इतका रोष आहे की, तुम्हीच सांगता की वर्तमानपत्रामध्ये डेंग्यूसाठी पाण्याची साठवण करु नका. आणि तुम्हीच पाण्याचा एक दिवस वाढवला व अधिकाऱ्यांस विचारल्यास ते म्हणतात मा.आयुक्तांचा आदेश आहे. पाण्याचा पुरवठा करण्याचा गॅपचा दिवस कमी करण्याऐवजी वाढविण्यात येत आहे हे योग्य नाही.

मा.महापौर :सदस्यांचे म्हणणे आहे की, पाण्याचा गॅप वाढविला असता, नागरिक पाण्याची साठवण जास्त करतील. त्याचा उलटा परिणाम होत आहे म्हणुन सुचना आहे की, आपण पाण्याचा गॅप कमी करायला पाहिजे. गॅप वाढल्यास पाण्याची साठवण करावी लागते व त्यामुळे शूद्ध पाण्यामध्ये डासांचे प्रमाण वाढते.

श्री.नितीन साळवी:पाणी साठवणीमुळे डांसाचे प्रमाण वाढणार व दुसरा विषय म्हणजे आमच्या वार्डात फवारणीसाठी कोणीच येत नाही. सध्या डेंग्युची साथ पसरली आहे. टिळकनगर भागात फवारणीचा माणूस आहे त्याच्याबद्दल आरोग्य अधिकारी श्रीमती राणे मॅडम यांना ४ वेळेस सांगितले की, फवारणी करण्यासाठी तो येत नाही. सर्व नागरिकांची तक्रार आहे की, डेंग्यूची साथ जास्त आहे. पाण्यात कीडे सापडतात. २५ तारखेला मोहिम काढणार होते तेही झाले नाही. श्री.राजपूत यांचे महाराणा एजन्सीचे कर्मचारी आहेत पगार नसल्यामुळे आम्ही काम करत नाही. असे स्पष्ट सांगतात.

श्रीमती स्वाती नागरे:ॲबेट व फवारणी केल्यानंतर कर्मचारी सदस्यांची सही घेण्यास येत होते व आता कुणीही येत नाही. वार्डात ॲबेटींग होत आहे हे माहित होत नाही. पण आता नागरिकांचे फोन येतात व माझ्या वार्डात ५ ते ६ जणांना डेंग्यु झालेला आहे. हे राणे मॅडमला ८ दिवसांपूर्वीच कळवले होते. फवारणीस कुणीही येत नाही.

मा.महापौर :फवारणी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यास सांगितले होते. पगाराच्या कारणामुळे जर महाराणा एजन्सीचे कर्मचारी गैरहजर राहत असतील तर त्यांना कडक सूचना द्याव्यात.

श्रीमती मिना गायके:एकदा मोहिम राबविली म्हणजे काम सफल होत नाही. वार्डात ६ व्या दिवशी पाणी येते तेही पाणी दूषित येते. माझ्या वार्डातही पाणी पुरवठा चौथ्या दिवशी करण्यात यावा. लोक पाणी साठवून ठेवणार नाही.

मा.महापौर :श्री.कोल्हे आता पाण्याचा गॅप कमी करण्यात यावा.

श्रीमती स्वाती नागरे:हडको व सिडकोचा पुरवठ्याचा गॅप कमी झाला पाहिजे.

श्रीमती मिना गायके:श्री.कोल्हे साहेब सांगतात की, तुमचे पाणी चौथ्या दिवशी होणार नाही.

मा.महापौर :श्रीमती गायके ताईच्या वार्डातील पाण्याचा गॅप कमी करा. जिथे ३ दिवस होते तिथे ४ दिवस केले तर जिथे ६ दिवस आहे ४ दिवसांवर आणावे.

श्रीमती स्वाती नागरे:पाणी साठवल्याने डेंग्यूचे डास तयार होतात. सहाव्या दिवशी पाणी येत असेल तर त्यांना पाणी साठवण केल्याशिवाय पर्याय नाही. आमच्या वार्डात गॅप कमी झालेला नाही.

श्रीमती ज्योती पिंजरकर:हडको व सिडको भागात सहाव्या दिवशी पाणी पुरवठा करण्यात येत आहे व तेही ४० ते ४५ मिनिटेच पाणी येते. अनेकदा कमी दाबाने पाणी येते.

मा.महापौर :डेंग्यु या आजारासंबंधी, पाण्याचा गॅप विषयी चर्चा करायची आहे. नियमित पाणी पुरवठ्यावर आपल्याला चर्चा करता येणार नाही. डेंग्यु आजाराचे मुख्य कारण पाण्याची साठवण आहे. त्यामुळे सर्व विभागात पाणी पुरवठा हा ३ किंवा ४ दिवसाआड करता येईल. यासाठी हे नियोजन केले जावे. पाणी पुरवठ्याची यंत्रणा वितरण व्यवस्था त्यावर नियमित सभेमध्ये चर्चा करु. फक्त डेंग्यु आजाराशी संबंधित विषय आहे सदस्यांचे म्हणणे आहे. सर्व विभागात ३-४ दिवसाआडपाणी वितरीत करतात. मग आमच्या वार्डात ७ दिवसांनी का? ते ३ किंवा ४ दिवस आडवर आणायचे आणि ज्यांचे २ दिवस असेल त्यांना ४ दिवस करायचे असे नियोजन करावे.

श्रीमती स्वाती नागरे:जायकवाडी धरण १०० टक्के भरले आहे तर आपल्याला पाणी का येत नाही.

मा.महापौर :आचारसंहिता आहे. त्या चौकटीच्या बाहेर जाऊन चर्चा करु नये. फक्त डेंग्यु या आजाराची साथ सुरु आहे. त्यासाठी ही चर्चा घेतली आहे. आचारसंहितेमध्ये पाणी वितरण व्यवस्था हा विषय चर्चेला घेता येणार नाही. फक्त प्रशासनला एक सुचना करायची की, पाण्याची साठवण ही गॅप जास्त असल्यामुळे होते म्हणुन अधिकाऱ्यांना आदेश काढलेले आहेत की, जिथे गॅप जास्त आहे. तिथे कमी करण्यात यावा. ॲबेट व इतर फवारणीकडे लक्ष द्यावे.

मा.महापौर :फवारणी, अबेटिंग, जनजागृती, आरोग्य तपासणी हे सर्व विषय जे आहेत. त्याविषयी आपण प्लॅनिंग करण्यात यावे. आरोग्य अधिकारी यांनी सर्व सुचना विचारात घ्याव्यात.

श्रीमती सायरा बानो:वार्ड नं.२३ चेलीपूरा येथे ५ नाले वाहतात. फॉगिंग व ॲबेट फवारणी नियमित करावी. ॲबेटींगसुध्दा झालेले नाही. याआधी स्थायी समितीच्या सभेत मी आरोग्य अधिकारी यांना सांगितले होते की, डेंग्युचा एक रुग्ण माझ्या वार्डात आहे. माझ्या

वार्डात सर्वात जुनी भाजीमंडी आहे. ५ नाले, एक भाजी मंडी असल्यामुळे तिथे जास्त प्रमाणात मच्छर आहेत. तिथे फवारणीचे काम होत नाही.

मा.महापौर :आरोग्य वैद्यकीय अधिकारी पाडळकर मॅडम व वैद्यकीय अधिकारी राणे मॅडम धुर फवारणीचा जवळपास सगळ्याच वार्डात तक्रारी आहेत. तुम्ही कर्मचाऱ्यांचा प्रत्येक दिवशीचा कामाचा अहवाल घेण्यात यावा व जिथे काम केले आहेत. त्यावर नगरसेवकांची किमान स्वाक्षरी घ्यावी. दररोज शक्य नाही. तर किमान १ दिवसाआड तरी २ दिवसांची एकत्र करुन सही घ्यावी. कर्मचाऱ्यांची कामावर रुजु होण्याची वेळ व कामावरुन जाण्याची वेळ याची थमइंप्रेशन नुसार नोंद घ्यावी. डॉक्टर्स किंवा मेडिकल ऑफिसर्सच्या अंडरमध्ये काम करायला सांगितले. तेही एकदा तपासून घ्यावे. धुळ फवारणी, ॲबेटिंग फवारणी करावे रंगार गल्लीमध्ये, औरंगपुऱ्यात, सनीसेंटरला गेलो तेथेही तीच तक्रार होती. फवारणीच्या बऱ्याच तक्रारी आहेत. कर्मचारी प्रभावीपणे काम करत नाही. त्यामुळे अडचणी निर्माण होत आहे. परंतु आपण सुद्धा कामाची निकड लक्षात घेऊन काम करायला पाहिजे. उद्या रविवार सुट्टी आहे ती रद्द करावी आणि सगळ्यांना कामाला लावावे.

श्री.गंगाधर ढगे :स्वच्छतेमध्ये रेड्डी या कंपनीला या शहराचे कॉन्ट्रक्ट दिले आहे. सर्व शहरात दुर्गंधी पसरली आहे व माश्या, डास, मच्छर होत आहे.

मा.महापौर :आचारसंहितेमध्ये इतर विषय घेता येणार नाही. ते आपल्यासाठी अडचणीचे होईल. त्यामुळे या ठिकाणी आजची सभा संपविण्यात येते.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपविल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित/-** | **स्वाक्षरित/-** |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |